# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

**प्रेसनोट**

# गणेशोत्सवासाठी पीएमपीएमएल कडून जादा बसेसचे नियोजन

श्री गणेशोत्सव कालावधीत पुणे शहरात नजीकच्या उपनगरातून व बाहेरगावहून गणपतीची रोषणाई/सजावट पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. या कारणास्तव प्रवासी नागरीकांचे सोयीकरीता प्रतीवर्षी प्रमाणे यंदाही पुणे महानगर परीवहन महामंडळाकडून दि. २०/०९/२०२३ ते दि. २८/०९/२०२३ या कालावधीत ६५४ जादा बसेसचे गणेशोत्सवाकरीता नियोजन करण्यात आलेले आहे.

- नागरिकांचे वाहतुकीचे सोयीसाठी खाली नमूद केलेल्या स्थानकावर प्रवासी गर्दीनुसार या कालावधीत खास बससेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.
- दैनंदिन संचलन गणेशोत्सव कालावधीमध्ये रात्रौ १०.०० नंतर बंद राहणार असून रात्रौ १०.०० नंतर सर्व बसेस यात्रा स्पेशल म्हणून संचलनात राहणार आहेत.
- रात्रौ १०.०० नंतर बससेवेसाठी प्रचलित दरामध्ये रूपये ५/- जादा दर आकारणी करण्यात येईल.
- गणेशोत्सव कालावधीत देण्यात येणारी ही रात्रौ बससेवा खास बससेवा असल्याने सर्व पासधारकांस रात्रौ १२.०० वाजेपर्यंत पासाची सवलत ठेवण्यात आलेली आहे. **रात्रौ १२.०० नंतर कुठल्याही प्रकारचे पास चालणार नाहीत.**
- श्री गणेशोत्सव कालावधीत शहर विभागातील रस्ते सायंकाळी पोलीस खात्याकडून बंद ठेवले जातात. त्यामुळे शहराच्या आतील भागातील बससेवा पर्यायी मार्गाने चालू ठेवण्यात येईल.

**दि. २०/०९/२०२३ ते दि. २८/०९/२०२३ या कालावधीत बसेस सुटण्याचे ठिकाणे**

| अ.क्र | स्थानकाचे नाव | बसमार्ग / शेवटचे ठिकाण |
|---|---|---|
| १. | स्वारगेट बस स्थानक | कात्रज, धनकवडी, भारती विद्यापीठ, नऱ्हे, आंबेगांव, जांभुळवाडी, अप्पर इंदिरानगर, मार्केटयार्ड. |
| | | पुणे स्टेशन, सांगवी, आळंदी. |
| | | वडगांव, धायरी व गरजेनुसार सिंहगड, खानापूर. |
| | | हडपसर, कोंढवा हॉस्पीटल. |
| २. | म.न.पा. स्थानक | लोहगांव, वडगांवशेरी, मुंढवागांव/केशवनगर, शुभम सोसायटी, आनंद पार्क, तळेगांव ढमढेरे, हडपसर. |
| | | भोसरी, चिंचवड, निगडी, देवाची आळंदी, देहूगांव, विश्रांतवाडी, पाषाण, सुतारवाडी, बालेवाडी, म्हाळुंगेगांव, तळेगाव दाभाडे, सांगवी, पिंपळे गुरव, आकुर्डी रेल्वे स्टेशन. |
| | | कर्वेनगर, माळवाडी, एनडीए १० नं. गेट, कोथरूड डेपो. |
| ३. | पुणे स्टेशन/मोलेदिना हॉल/ससून रोड बस स्थानक | विश्रांतवाडी, लोहगांव, वाघोली, विमाननगर, वडगांव शेरी, आळंदी. |
| ४. | हडपसर गाडीतळ बस स्थानक | स्वारगेट, पुणे स्टेशन, मनपा भवन, सासवड, ऊरूळी कांचन, मांजरी, थेऊर, फुरसुंगी, देवाची ऊरूळी. |
| ५. | महात्मा गांधी बस स्थानक | कोंढवा खुर्द, कोंढवा बुद्रुक , साळुंके विहार. |
| ६. | डेक्कन जिमखाना / संभाजी पूल कॉर्नर | कर्वेनगर, माळवाडी, एनडीए १० नं. गेट, गोखले नगर, कोथरूड डेपो. |
| ७. | निगडी बस स्थानक | म.न.पा. भवन करीता. |
| ८. | भोसरी बस स्थानक | म.न.पा. भवन करीता. |
| ९. | चिंचवडगांव बस स्थानक | म.न.पा. भवन करीता. |

➢ दि.२०/०९/२०२३ ते दि.२८/०९/२०२३ पर्यंत प्रवाशांच्या मागणीनुसार स्वारगेट ते निगडी अशा रात्रौ (यात्रेकरिता) जादा बसेस सोडण्यात येतील.

श्री गणेशोत्सव कालावधीत वरील तक्त्यात दर्शविलेल्या बस स्थानकांवरून त्या समोर दर्शविलेल्या ठिकाणापर्यंत रात्रौ गरजेनुसार बससेवा देण्यात येणार आहे.

गणेशोत्सव कालावधीत गणेश भक्तांच्या सोयीसाठी वरील प्रमाणे जादा बस संचलन करण्यात येणार आहे. तसेच शहरातील मुख्य रस्ते बस वाहतुकीसाठी बंद राहणार असून प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून दिवसभराच्या संचलनामध्ये नेहमीच्या शिवाजीरोड, बाजीरावरोड, लक्ष्मीरोड, टिळकरोड या रस्त्यांवरून संचलनात असलेल्या बसेसच्या मार्गामध्ये आवश्यकते नुसार बदल करण्यात येणार आहे, याची सर्व प्रवाशांनी नोंद घ्यावी व सहकार्य करावे, असे आवाहन पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून करण्यात येत आहे.

sd/-
**चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---

दि. १५/०९/२०२३

मा. संपादक,
दैनिक ..........

यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.
मा. स. कळावे.

sd/-
**कामगार व जनता संपर्क अधिकारी**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---